# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २२६ वा शनिवार दि.०१ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेसाठी तंत्रज्ञानच आधारस्तंभ : मुख्यमंत्री

मुंबई : विशेष प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या धोरणांमुळे राज्य हे देशाच्या स्टार्टअप आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर आहे. जेव्हा आपण ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहतो, तेव्हा तंत्रज्ञान हा विकासाचा मुख्य आधारस्तंभ असतो. फिनटेक आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्सला गती देण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई टेक वीक-२०२५ चा आज शुभारंभ झाला. या उद्घाटन प्रसंगी ऋषी दर्डा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जियो कन्वेंशन सेंटर येथे मुलाखत घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विकासाचे भविष्यातील रोडमॅप आणि राज्य सरकारच्या तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वॉर रूममुळे प्रकल्पांच्या निर्णय प्रक्रियेला वेग मिळाला आहे. पूर्वी मुंबईत एखादा प्रकल्प सुरू करण्यासाठी १८ विविध सरकारी यंत्रणांची परवानगी घ्यावी लागायची, त्यामुळे प्रकल्पांना विलंब होत असे. वॉर रूमच्या माध्यमातून सर्व संबंधित अधिका-यांना एकाच ठिकाणी एकत्र आणले आणि त्वरित निर्णय घेण्यास सुरुवात केली. याच कारणामुळे मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू यासारख्या प्रकल्पांना गती मिळाली, असे फडणवीस म्हणाले.

आगामी पाच वर्षांत महाराष्ट्र सरकार तीन मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रीत करणार आहे. यात वाढवण बंदर हा प्रकल्प मुंबईच्या अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडविणारा आहे. हा पोर्ट सध्याच्या जे.एन.पी.टी. पेक्षा तीनपट मोठा असून, २० मीटर खोल बंदर असल्यामुळे जगातील सर्वात मोठी जहाजे येथे थांबू शकतील. त्याच बरोबर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व नव्या स्मार्ट सिटी उभारणीवर लक्ष केंद्रित करणार आहे. हे विमानतळ पूर्ण झाल्यावर आजूबाजूला एक नवीन व्यापारी आणि तंत्रज्ञान केंद्र विकसित केले जाणार आहे. ही नवी शहरे मुंबईच्या तुलनेत तीनपट मोठी असतील आणि उद्योगांसाठी उत्तम संधी उपलब्ध करतील, असेही त्यांनी सांगितले. तसेच नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा आणि गोदावरी जलप्रकल्प हाती घेतले जात आहेत. या प्रकल्पांमुळे हजारो शेतक-यांना फायदा होईल आणि शेती उत्पादन वाढणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

राज्यातील सायबर सुरक्षा उपाययोजना संदर्भात उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, आज जगभरातील गुन्हेगारी सायबर जगतात शिफ्ट होत आहे. भविष्यात ७०% गुन्हे हे सायबर गुन्हे असतील. त्यामुळे आम्ही नवी मुंबईत भारतातील सर्वात आधुनिक सायबर सुरक्षा केंद्र उभारले आहे.

## उद्धव ठाकरेंच्या तोंडी औरंगजेबाचा जप



मुंबई : उद्धव ठाकरे हे सभेत दाखवण्यापूरती हातात रुद्राक्षाची माळ घेतात, त्यांच्या तोंडात कायम औरंगजेबाचा जप सुरू असतो, असा आरोप करत मंत्री आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांना हिंदुत्ववादी ढोंगी, असे देखावे करीत असल्याची टीका शेलार यांनी केली आहे.

या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे मंत्री आशिष शेलार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्यावर हिंदुत्व वादाच्या मुद्यावरून जोरदार निशाणा साधला. आयोध्येत प्रभू रामाचे भव्य मंदिर उभे राहिले. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी लोकांनी तेथे दर्शन घेऊन आले असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर आमच्या छत्रपती संभाजी महाराजांवरील छावा सिनेमाला मात्र महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी लोकांनी तो पाहिला असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे.

## सगळ्या फाईल्स फेकून देईन; न्यायमूर्ती वकिलांवर संतापले

नवी दिल्ली : वृत्तसंस्था सुप्रीम कोर्टात एका सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती अभय ओका चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. वकिलांनी सुनावणी दरम्यान केलेल्या वर्तणुकीमुळे न्यायमूर्ती अभय ओका यांनी संताप व्यक्त केला. कोर्टरुममध्ये एकाच वेळी अनेक वकिलांनी आपापले युक्तिवाद मांडण्यास सुरुवात केली. हे पाहून न्यायमूर्ती ओका यांनी वकिलांना शांत राहून एक एक करुन युक्तीवाद करण्यास सांगितले. मात्र वकिलांनी न्यायमूर्तींचेही ऐकले नाही आणि गोंधळ घालणे चालूच ठेवले. हे पाहून न्यायमूर्ती ओका वकिलांवर संतापले.

न्यायमूर्ती अभय एस. ओका यांनी असा शिस्तीचा अभाव पाहून मी कंटाळलो आहे, असे म्हटले. न्यायालयात दररोज शिस्तीचा अभाव दिसून येत आहे. आम्ही वकिलांना विचारत राहतो की ते कोणासाठी हजर आहेत, पण वकील काहीच उत्तर देत नाहीत, अशा शब्दात न्यायमूर्ती अभय एस. ओका यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती एस. ओका वकिलांवर संतापल्याचे हे काही पहिलेच प्रकरण नाही. याआधीही अनेक



प्रकरणांमध्ये वकिलांकडून खोटी माहिती मिळत असल्याबद्दल न्यायमूर्ती एस. ओका यांनी नाराजी व्यक्त केली होती. सप्टेंबर २०२४ मध्ये न्यायमूर्ती एस. ओका आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने म्हटले होते की, अशी अनेक प्रकरणे आमच्यासमोर आली आहेत ज्यात खोटे युक्तिवाद करण्यात आले आहेत.

सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनीही या प्रकारावर भाष्य केलं. या गोंधळात अनेक हस्तक्षेप करणारे लोक आहेत, जे केस कोर्टाबाहेर फेकण्याचा प्रयत्न करत आहेत. खटला बंद करणं हा त्यांच्या कामाचा भाग आहे.

## ‘वक्फ दुरुस्ती’ला मंत्रिमंडळाची मंजुरी




नवी दिल्ली : वक्फ दुरुस्ती विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी मंजुरी दिली. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा १० मार्च ते ४ एप्रिलपर्यंत चालेल. यादरम्यान वक्फ विधेयक संसदेत मांडले जाण्याची शक्यता आहे.

वक्फ विधेयकासाठी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) अहवालानुसार या विधेयकाचा नवा मसुदा तयार करण्यात आला आहे. यात ४४ दुरुस्त्यांपैकी एनडीएच्या सदस्यांनी मांडलेल्या १४ दुरुस्त्या स्वीकारण्यात आल्या होत्या. विरोधी पक्षांनी मांडलेल्या दुरुस्त्या फेटाळून त्या आधारे नवा मसुदा तयार करण्यात आला आहे.

राज्यसभेत खा. मेधा कुलकर्णी यांनी तर लोकसभेत जेपीसीचे चेअरमन भाजप खासदार जगदंबिका पाल यांनी हा अहवाल सादर केला होता. यावर दोन्ही सभागृहांत विरोधकांनी आक्षेप नोंदवला होता. यावरून संसदेत गोंधळही झाला होता. विरोधकांनी सुचवलेली एकही दुरुस्ती मान्य केली नसल्याने विरोधक आक्रमक झाले होते. देशात वक्फ बोर्डाकडे सुमारे ९ लाख एकरहून अधिक जमीन आहे. म्हणजेच देशात रेल्वे आणि संरक्षण मंत्रालयानंतर सर्वाधिक जमीन असलेली वक्फ बोर्ड ही एकमेव संस्था आहे.

## समुद्रात अचानक बोट पेटली




अलिबाग : येथे आज पहाटे चार वाजता एका बोटीला आग लागल्याची घटना समोर आली. आग अक्षी अलिबाग येथे किना-यापासून ६-७ नॉटिकल मैल अंतरावर राकेश गण यांच्या मासेमारी बोटीला आग लागली. ही घटना शुक्रवारी पहाटे ४ वाजता घडली. बोटीला आग लागल्याची माहिती मिळताच नौदलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय नौदलाने बोटीतील सर्व १८ क्रू मेंबर्सना सुरक्षितपणे वाचवले. भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय नौदल वेळीच घटनास्थळी दाखल झाले. बोटीतील सर्व १८ जणांना सुखरूप वाचवले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या घटनेचा व्हिडीओ एएनआयने शेअर केला आहे. आगीने बोटला पूर्णपणे वेढा घातल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. बोट एका बाजूला झुकली आहे. नौदल मच्छीमारांना वाचवत असल्याचे दिसत आहे.

## राजस्थानातील पेच सुटला; ६ आमदारांचे निलंबन रद्द



जयपूर : वृत्तसंस्था राजस्थान विधानसभेत आठवडाभर सुरू असलेला पेच सुटला आणि सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू झाले. त्यानंतर काँग्रेसच्या सहा आमदारांचे निलंबनही रद्द करण्यात आले. मंत्री अविनाश गहलोत यांनी माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांच्याबाबत केलेल्या विधानावरून ठप्प झालेले कामकाज मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या हस्तक्षेपानंतर पुन्हा सुरू झाले. शर्मा यांनी विधानसभा अध्यक्ष वासुदेव देवनानी आणि विरोधी पक्षनेते टीकाराम जुली यांची बैठक घेतली व चर्चा केली. संपूर्ण समाधान झाल्यानंतर काँग्रेसच्या आमदारांनी सभागृहात प्रवेश केला, तसेच कामकाजात सहभाग नोंदवला. ठप्प झालेले कामकाज पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल विरोधी पक्षनेत्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. काँग्रेस आमदार गोविंद सिंह डोटासरा यांनी अध्यक्षांबाबत वापरलेल्या शब्दांबाबत त्यांच्या वतीने माफीही मागितली. यानंतर डोटासरा यांच्यासह सहा आमदारांचे निलंबन रद्द करण्यात आले. मुख्यमंत्री म्हणाले की, अशा प्रकारचा प्रसंग आलाच तर कामकाज फार काळ ठप्प होता कामा नये. दरम्यान, विधानसभेचे कामकाज ठप्प झाल्यामुळे काँग्रेसने गुरुवारी सभागृहाबाहेर मॉक सेशन घेतले. फलक घेतलेल्या काँग्रेस सदस्यांनी सभागृहाकडे मार्च काढला व सभागृहाच्या परिसरात घोषणा दिल्या.


## रस्ते, इमारतींची कामे गुणवत्तापूर्ण करण्याला प्राधान्य द्यावे - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

### ‘सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक




लातूर :- सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्ह्यात करण्यात येत असलेली रस्ते आणि इमारत बांधकामाची सर्व कामे गुणवत्तापूर्ण याची काळजी घ्यावी. बांधकामाचा दर्जा आणि गुणवत्ता याला प्राधान्य द्यावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या. शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, गणेश क्षीरसागर, अलका ढोके यांच्यासह उपअभियंता, सहायक अभियंता आदी यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यातील विविध भागातील रस्ते, इमारतींची काम विहीत कालावधीत पूर्ण करण्यासाठी योग्य नियोजन करावे. या कामांना अभियंत्यांनी भेटी देवून कामांचा दर्जा तपासावा. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणारे प्रत्येक काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. रस्त्यांच्या बाजूला, इमारत परिसरात वृक्षारोपण करताना स्थानिक प्रजातींच्या, विशेषतः अधिक प्रमाणात सावली देणाऱ्या वृक्ष लागवडीला प्राधान्य द्यावे, असे पालकमंत्री ना. भोसले यावेळी म्हणाले. तसेच कार्यालयीन स्वच्छता, आधुनिक तंत्रज्ञानाचा कामकाजात वापर आदी बाबींकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाने राबविलेल्या विविध उपक्रमांचे पालकमंत्री ना. भोसले यांनी यावेळी कौतुक केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. शेख यांनी लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या रस्ते व इमारत बांधकामांची माहिती दिली. तसेच रस्त्यांवर निगराणी ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. यासोबतच रस्त्यांवरील खड्डे बुजविणे व इतर दुरुस्तीची कामे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## ६० अब्ज डॉलर्सची मदत बंद; ‘युएसएड’चे करार रद्द



वॉशिंग्टन : वृत्तसंस्था ‘यूएसएड’ अर्थात युनायटेड स्टेटस् एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटच्या माध्यमातून जगभरातील विविध देशांना अमेरिकेतून दिल्या जाणा-या आर्थिक मदतीसंबंधीचे ९० टक्के करार संपुष्टात येतील. या माध्यमातून जगभरात दिल्या जाणा-या ६० अब्ज डॉलरची मदत बंद केली जात आहे. यानंतर अगदी मोजक्या योजनाच सुरू राहतील. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक धोरणामुळे ‘यूएसएड’ने ९० टक्के करारांना कात्री लावण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प प्रशासनाने यासंबंधीचा आराखडा सादर केला आहे. ‘यूएसएड’च्या मदतनिधी कपातीच्या निर्णयात अमेरिकी संघीय सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी हस्तक्षेप केला. फेडरल न्यायालयाने ट्रम्प प्रशासनास इतर देशांना दिल्या जाणा-या अब्जावधी डॉलरची मदत देण्याप्रकरणी मध्यरात्रीपर्यंत मुदत दिली होती. या आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली. याबाबत वरिष्ठ न्यायालयात जोवर सर्वार्थाने विचार केला जात नाही तोवर ही स्थगिती कायम राहणार आहे. भारतीयांना अमेरिकी कंपन्यांत संधी अमेरिकेत प्रस्तावित ‘गोल्ड कार्ड’ योजनेमुळे तेथील कंपन्यांना हार्वर्ड आणि स्टॅनफोर्डसारख्या विद्यापीठांत शिकलेल्या भारतीय पदवीधारकांना नियुक्त करण्याची परवानगी मिळणार आहे. या योजनेत सुमारे ४४ कोटी रुपये शुल्क भरून अमेरिकेत राहण्याचा, काम करण्याचा अधिकार मिळेल. म्हणजेच एखाद्या व्यक्तीकडे ग्रीन कार्ड असेल आणि हे एक गोल्ड कार्ड घेतले तर ग्रीन कार्डचे सर्व अधिकार त्याला मिळतील. शिवाय अमेरिकी नागरिकत्व मिळवण्याचे मार्गही मोकळे होतील. या ‘गोल्ड कार्ड’ खरेदीतून मोठा महसूल मिळवण्याचा ट्रम्प यांचा हेतू आहे. शिवाय, हेच श्रीमंत लोक अमिरिकेत वास्तव्यास राहिले तर मोठ्या प्रमाणात कर भरतील.

## संपादकीय....

# रोजगाराचा नवीन फंडा..!

रोजगारनिर्मितीची आपल्या देशाची क्षमता अफाट आहे. रोजगार मिळवण्यासाठी नवनवीन आयडिया काढणार्या युवकांची ही देशात काही कमी नाही. शहरी भागामध्ये अत्यंत गर्दीचा असणारा एखादा रस्ता असतो. समजा एखाद्या ज्येष्ठ नागरिकाला तो ओलांडायचा आहे, तर त्याला खूप भीती वाटत असते. चित्रविचित्र पद्धतीने वाहने चालवणारे लोक अंगावर येण्याची शक्यता असते. अशावेळी त्या ज्येष्ठ नागरिकाला रस्ता क्रॉस करून देऊन त्याबद्दल त्याच्याकडून दहा रुपये घेणारे अनेक युवक ट्रॅफिक सिग्नलवर दिसतात. या रोजगारामध्ये युवक ज्येष्ठ नागरिकाला हाताला धरून रस्ता ओलांडून देतात आणि त्याच्याकडून दहा रुपये घेतात. रस्त्याच्या त्या टोकाला गेल्यानंतर पुन्हा इकडच्या टोकाला येणारे ज्येष्ठ नागरिक भेटले की, त्यांना तिकडून इकडे आणून सोडतात, त्याचे ते दहा रुपये घेतात. अशा फेर्या दिवसभर मारून हजार एक रुपये कमवणारे अनेक तरुण महानगरांमध्ये आहेत. आहे की नाही रोजगार निर्मितीची अद्भुत आयडिया?

कोरोना काळामध्ये आणि एकंदरीतच आजच्या काळात माणसांमधील प्रेम कमी झाल्यामुळे लोक कुत्री पाळायला लागली आहेत. उच्च मध्यमवर्गीय सुमारे ७० टक्के घरांमध्ये श्वान पाळलेले असतात. श्वान पाळताना तो अत्यंत उत्साहाने आणि विशेषतः लहान मुलांच्या आग्रहाखातर पाळला जातो. हा कुत्रा साधारण तीन महिन्यांचा झाला की, त्याला शी आणि सू करण्यासाठी बाहेर न्यावे लागते. महानगरांमध्ये घरांसाठी फ्लॅट सिस्टीम आहे. या श्वानाने घरामध्ये शी-सू करू नये म्हणून त्याला प्रयत्नपूर्वक सोसायटीच्या बाहेर हे विधी करण्याचे शिकवले जाते. घरातील मंडळी अत्यंत बिझी असतात. त्यांना त्या श्वानाला बाहेर नेण्यासाठी वेळ नसतो. यासाठी एक नवीन रोजगार निर्माण झाला आहे. याला डॉग वॉकर असे म्हणतात. कुत्रे फिरायला नेणारे लोक त्या कुत्र्याला घरामध्ये बसून, कोंडून, कंटाळा येत असेल, त्याच्या वर्तणुकीमध्ये उत्साह यावा म्हणून असेल किंवा बाहेर शी-सू करावी म्हणून असेल; पण त्याला बाहेर न्यावेच लागते. लोकांची ही गरज लक्षात घेऊन जे लोक तुमच्या घरी येऊन तुमच्या कुत्र्याला बाहेर फिरवून आणतात त्यांना डॉग वॉकर असे म्हणतात.

कुत्र्याला फिरायला नेणार्या व्यक्तीच्या दृष्टीने म्हणजेच डॉग वॉकरच्या दृष्टीने आपण या रोजगाराचा आढावा घेऊयात. सकाळी सहा वाजता एखाद्या व्यक्तीने श्वान फिरवून आणण्यास सुरुवात केली, तर तो एका सोसायटीमधील दोन किंवा तीन कुत्रे बरोबर घेऊन बाहेर फिरायला जातो आणि बरोबर अर्धा तास त्यांना बाहेर फिरवून घरी आणून सोडतो. समजा आपण असे गृहीत धरूया की, सकाळी सहा ते सात तीन कुत्रे, सात ते आठ तीन कुत्रे आणि आठ ते नऊ तीन कुत्रे फिरवता येतील. याचा अर्थ सकाळी नऊ कुत्रे आणि संध्याकाळी तेच नऊ कुत्रे असेच एक व्यक्ती सकाळचे तीन तास आणि संध्याकाळचे तीन तास असे काम आरामात करू शकतो. डॉग वॉकर्सना आपल्या कुत्र्याला फिरवून आणण्यासाठी सकाळची आणि संध्याकाळची वेळ महत्त्वाची असते.

कारण, दुपारच्या उन्हाचा श्वानांना त्रास होऊ शकतो. आता आपण पाहिल्याप्रमाणे नऊ कुत्रे गुणिले प्रत्येकी ७ हजार रुपये गृहीत धरले, तर सदरील व्यक्ती महिन्याला ६३ हजार रुपये कमवते असे लक्षात येईल. हा एक पार्टटाईम रोजगार आहे आणि बहुतांश ठिकाणी हे काम परप्रांतीय लोक करत आहेत. सकाळी नऊ वाजता श्वान फिरवून आणले की, ते आपल्या नियमित कामाला जातात. तिथे काय कमवायचे असेल ते कमवतात आणि संध्याकाळी सात ते रात्री दहापर्यंत त्याच श्वानांना पुन्हा फिरायला नेऊन परत आणून सोडतात. एकही रुपयाची गुंतवणूक न करता किमान ५० हजार आणि जास्तीत जास्त ७० हजारांपर्यंतची कमाई डॉग वॉकर करत आहेत. रोजगार नाही म्हणून ओरडणार्या लोकांनी अशा आयडिया शोधून काढल्या पाहिजेत. त्यासाठी आधी तुम्हाला जनमानसाची काय गरज आहे, याची जाणीव असली पाहिजे. आपल्याला बाहेर जावे लागत नाही म्हणून मालक खूश, तर श्वानाला फिरवून आणायचे पैसे मिळतात म्हणून डॉग वॉकर खूश, असा हा सगळा उभयपक्षी खुशीचा मामला आहे. कोण म्हणतो हाताला काम नाही म्हणून?

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या हवाली करा !

महाकारुणीक तथागत भगवान गौतम बुद्धांना जेथे ज्ञानप्राप्ती झाली ते बुद्धगया येथील प्राचीन महाबोधी महाविहार हे जगभरातील सर्व बौद्धांचे धार्मिकस्थान सर्वोच्च पवित्र श्रद्धास्थान आहे. बौद्धांचे श्रद्धास्थान बौद्धांच्याच ताब्यात असले पाहिजे. महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देणे हा नैसर्गिक न्याय ठरेल. महाबोधी महाविहाराचा ताबा बौध्दांना मिळावा यासाठी राष्ट्रीय स्तरावर १२ फेब्रुवारीपासून देशभरातील विविध बौद्ध संघटनांचे मोठे आंदोलन सुरु आहे. भारतीय व जागतिक बौद्ध संघटना बुद्धगया महाबोधी महाविहाराजवळ बुद्धगया महाबोधी महाविहार पूर्णपणे बौद्धांना सोपवण्यासाठी निदर्शने करित आहेत. महाबोधी महाविहाराचा ताबा बौध्दांना न मिळण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे, बुद्धगया मंदिर कायदा १९४९ या कायद्यामध्ये महाबोधी विहाराला मंदिर म्हणून उल्लेखित करण्यात आले आहे. या कायद्यात अशी तरतूद आहे की, महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन पाहण्यासाठी व प्रत्येक निर्णय घेण्यासाठी नऊ सदस्यीय समिती असेल. या नऊ सदस्यापैकी पाच सदस्य हिंदू असतील व उर्वरित चार सदस्य बौद्ध असतील. या नऊ सदस्यीय समितीमध्ये एक सदस्य गया जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी असेल व तोच या समितीचा अध्यक्ष सुद्धा असेल.



त्यापुढे जाऊन हा कायदा म्हणतो की, जर गया जिल्ह्याचा जिल्हादंडाधिकारी हा गैरहिंदू असेल तर तो या समितीचा अध्यक्ष होऊ शकणार नाही. सरकार एकूण सदस्यापैकी, अध्यक्ष म्हणून हिंदूचीच निवड करेल. त्यानंतर या कायद्यानुसार समितीची बैठक घेण्यासाठी, विहाराबाबत कोणताही निर्णय घेण्यासाठी कमीतकमी ४ सदस्य उपस्थित असणे गरजेचे आहे. समितीवर ५ सदस्य हिंदूच असतात, म्हणजे उरलेले ४ बौद्ध सदस्य नसले तरी विहाराबाबतचा प्रत्येक निर्णय घेतला जातो. हेच त्यामागचे सर्वात मोठे कारण ! या कायद्यामध्ये मध्ये ५ गैर-बौध्द सदस्यांना ठेवणे हा बौध्द धम्माचा उघड-उघड अपमानच नाही तर अन्याय देखील आहे. विशेषतः एका शैव महंत ब्राह्मणाला समितीवर ठेवणे हा बौद्ध धम्माचा अपमान आहे. कारण आदि शंकराचार्यांनी बौद्धधम्माविरुद्ध हिंसाचाराची मोहीम सुरू केली होती. त्याच ब्राह्मणांना महाबोधी महाविहार ताब्यात देणे हा न्याय आहे का? जर हिंदू धर्माचे देवळातील व्यवस्थापन हिंदू धर्मिय लोकांकडे, मुस्लीमांच्या मश्चिदीचे व्यवस्थापन मुस्लीमांकडे, चर्चचे व्यवस्थापन ख्रिश्चनांकडे, गुरुद्वाराचे व्यवस्थापन शिख लोकांकडे तर बौध्दांच्या महाबोधी महाविहाराचा संपूर्ण ताबा बौध्दांकडे का नाही? संविधानातील सार्वभौम हा शब्द सर्व धर्मियासाठी लागू व्हावा.

संशोधक फ्रान्सिस बुकाननच्या कागदपत्रावरून महंत ब्राह्मणांची कोठी ही सम्राट अशोकाच्या राजवाड्यावर बांधलेली असल्याचे ऐतिहासिक पुरावे सिद्ध होतात. या जागेचे उत्खनन करून ते राष्ट्रीय वारसा घोषित करावे. खरेतर भारताची खरी ओळख सम्राट अशोक यांच्यामुळेच आहे आणि महंतांच्या हवेलीत असलेल्या शाक्यमुनी तथागत बुद्धांच्या शेकडो मूर्ती आणि शिलालेख ताबडतोब बौध्दगया येथील संग्रहालयात स्थलांतरित केले पाहिजेत, अशी सरकारकडे मागणी करण्याची गरज आहे. महंतांच्या हवेलीत शेकडो बुद्ध मूर्ती आणि शेकडो बौद्ध राजांच्या नोंदी आहेत, हे स्वतःहून घडले का? चौथ्या शतकात आलेल्या फाड्यान आणि सातव्या शतकात आलेल्या व्हेनसांग यांच्या प्रवासवर्णनांवरून असे दिसून येते की, बौध्दगया महाबोधी महाविहारात कुठेही शिवमंदिर नव्हते.

व्हेनसांग यांच्या प्रवासवर्णनां वरून महाबोधी महाविहाराला एक दीर्घ पुरातन इतिहास असल्याचे दिसून येते. इ.स ६०० च्या दरम्यान राजा शशांकने बोधिवृक्ष व महाविहारातील बुद्ध प्रतिमा तोडण्याचा आदेश दिला. त्याने बंगाल प्रांतातील अनेक बुद्धविहार आणि स्तूप तोडून टाकले होते. अतिशय शिताफीने कामरूपचा राजा भास्करवर्मन ने बुद्ध प्रतिमा आणि बोधिवृक्ष त्याच्या विश्वासू मंत्र्यांमार्फत वाचविले व साधारणतः इ.स. ६२० मध्ये बोधीवृक्षाभोवती २४ फूट उंचीची भिंत बांधली. तसेच इ.स. ६३७ मध्ये हुयान त्सांग ने महाबोधी महाविहाराला भेट दिली. त्याच्या लेखात आलेला प्रवेशद्वार व भव्य मंडप हा त्याकाळी ब्रह्मदेशाचा राजा साडो याने बांधला होता. हुयान त्सांगच्या भेटीच्या आधी येथील फाल्गु (नेरंजना) नदीला पूर आला होता व त्याचे पाणी व वाळू संपूर्ण महाविहार परिसरात पसरली होती. महाविहारात अक्षरशः अडीच फूट उंच वाळू साचली होती व त्यात वज्रासन देखील दाबले गेले होते. हुयान त्सांग ने वर्णन केल्याप्रमाणे महाबोधी महाविहार १७० फूट उंच होते, बोधीवृक्षाच्या भोवती उंच भिंत होती व संपूर्ण बांधकाम प्लास्टर केलेल्या लाल रंगाच्या निळसर छटा असलेल्या विटांनी बनविले होते. महाविहाराच्या भिंतींवर अनेक ठिकाणी कोनाडे केले होते व त्यात सोन्याचा मुलामा असलेली बुद्धमूर्ती ठेवल्या होत्या. महाविहाराच्या पूर्वेला तीन मजली मंडप होता व त्याच्या आतील भिंतीवर सोन्या-चांदीने सजवलेली कलाकुसर होती. महाविहाराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला अवलोकितेश्वर आणि मैत्रयाच्या १० फूट उंच मूर्ती होत्या.



बुद्धांच्या बुद्धगया येथील ७ आठवड्यांच्या वास्तव्यात त्यांनी ध्यानमग्नतेत व्यतीत केलेल्या प्रत्येक ठिकाणी सम्राट अशोकाने सुंदर कोरीव स्मृतिस्थळ बांधल्या होत्या. या व्यतिरिक्त अशोकाने अनेक ठिकाणी स्तूप बांधली ज्यात सुजाताने बुद्धांना ज्याठिकाणी खीर दिली, त्यात कश्यप बंधूंनी बुद्ध-धम्माची दीक्षा घेतली व मातीपोसक जातकाचे ठिकाण सामील होते. हे सर्व स्तूप १८ व्या शतकापर्यंत अस्तित्वात होती, नंतर महंतांच्या अलिखित सूचनेनुसार तेथील गावकऱ्यांनी हे स्तूप पोखरून तेथील विटा काढून आपली घरे बांधण्यास सुरुवात केली. कनिंघमला नंतर उत्खनन करतांना लाखेच्या अनेक मूर्ती सापडल्या. महाबोधी महाविहाराचे संवर्धनाचे काम अनेक राजांनी आणि असंख्य अनामिक दानदात्यांनी केले. त्याकाळी महाविहार भोवती जे नक्षीदार कुंपण अशोकाने बांधले होते त्यावर अनेकांनी शिलालेख कोरून ठेवले. एका शिलालेखात एका दानदात्याने २५० दिनार (गुप्तकालीन सोन्याचे नाणे) दान दिले. त्याचबरोबर महाविहार रोज दीप पूजनाच्या तुपासाठी ३०० गाय महाविहाराला दान दिल्याचे दिसते.

तसेच ७ व्या शतकाच्या सुमारास इत्सिंगने महाबोधी महाविहास भेट दिल्याचे कळते. त्याने वर्णन केल्याप्रमाणे अनेक व्यापारी आणि राजांनी महाबोधी महाविहाराच्या स्वरंक्षण आणि संवर्धनासाठी अनेक गावे दान दिला होती. आता मात्र बीटीएमसीचे बौद्धेतर लोक विशेषतः ब्राह्मण महंत, त्यांच्या ब्राह्मण कर्मचाऱ्यांद्वारे बुद्धाच्या पाच मूर्तींना पांडव म्हणून प्रचार करत आहेत आणि पवित्र महाबोधी महाविहाराच्या व्हरांड्यात एका खोलीत शिवलिंग स्थापित करून हा आंतरराष्ट्रीय वारसा हडप करू इच्छितात. बौध्दगया ही केवळ बिहार किंवा भारताचीच नव्हे तर जगाचीही अभिमानाची गोष्ट आहे. बौध्दगया ही जागतिक वारसा आहे. 'महाबोधी महाविहार मंदिर कायदा १९४९' मुळे हे पवित्र स्थान मनुवादी लोकांकडून बळकावले जात आहे. बिहार राज्याचे राज्यपाल आर्लेकर यांनीही बौध्दगया येथे येऊन महंत ब्राह्मणांच्या ताब्यातील जागा बौध्दगया शिवालय म्हणून ओळखली आहे. त्यामुळे राज्यपालपद भूषविणाऱ्या व्यक्तीला हे शोभत नाही. त्यांच्यावरही कठोर कारवाई झालीच पाहिजे.

जर बौध्दांना महाबोधी महाविहाराचा ताबा मिळवायचा असेल तर सर्वात पहिल्यांदा हा कायदा रद्द होणे गरजेचे आहे. हा कायदा रद्द करण्यात यावा यासाठी बौध्दांना आवाज उठवावा लागेल, आंदोलन करावे लागेल. महाबोधी महाविहाराला पाखंड्यांपासून मुक्त करण्यासाठी आणि महाबोधी महाविहार बौद्धांच्या स्वाधीन करण्यासाठी, देशव्यापी जेलभरो आंदोलने सुद्धा होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. म्हणून 'बुद्धगया महाबोधी महाविहार मंदिर कायदा १९४९' तात्काळ रद्द करावा आणि हे पवित्र बौद्ध स्थळ भारतातील बौद्धांना सोपविण्यासाठी एक नवीन कायदा करावा, अशी सर्वतोपरी मागणी उचलून धरावी लागेल. जर सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर देशभर तीव्र निषेध सुद्धा होऊ शकतो. भविष्यात श्रृंखलाबंद न्यायिक आंदोलनाचे स्वरुप, जाळपोट, धरणे, आंदोलने, रॅली प्रदर्शने आणि शेवटी बौध्दगया येथे लाखो लोकांचा एक मोठा मेळावा होऊ शकतो. जर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची असेल.

# दोषी राजकारण्यांवर निवडणूक लढण्यावर आजीवन बंदी का नाही?

गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो कारण गुन्हा हा लहान-मोठे अशा पध्दतीने ठरविला जात नाही.त्यामुळे सर्वसामान्यांनी केलेला गुन्हा असो अथवा राजकारण्यांनी केलेला गुन्हा असो यांना समान वागणूक व समान शिक्षा व्हायला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.परंतु देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की, राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या स्वार्थासाठी आपल्या पध्दतीने नियम व कायदे बनविल्याचे दिसून येते.त्यामुळे अनेक राजकारणी बाहुबली या नावाने ओळखले जाते.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून दोषी खासदार आणि आमदारांना निवडणूक लढण्यास कायमची बंदी घालावी का,यावर उत्तर मागितले होते.या प्रकरणी केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रत्युत्तरादाखल,असे म्हटले गेले की गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकारण्यांना शिक्षा भोगल्यानंतर आयुष्यभर निवडणूक लढवण्यास बंदी घालता येत नाही.या प्रतिज्ञापत्रावरून असे लक्षात येते की,केंद्र सरकारने सादर केलेले प्रतिज्ञापत्र फक्त राजकारण्यांच्याच फायद्याचे असल्याचे दिसून येते व यावरून स्पष्ट होते राजकारणी गुन्हेगार आणि सर्वसाधारण गुन्हेगार यात जमीन-आसमानचा फरक आहे हे सरकार प्रतिज्ञापत्रा सिध्द केल्याचे दिसून येते. आपण अनेकदा पहाले सर्वसाधारण गुन्हेगारांना थर्ड ग्रेडची वागणूक दिली जाते आणि राजकीय गुन्हेगारांना किंवा राजकारण्यांना व्हिआयपीची ग्रेडची वागणूक दिली जाते ही सर्वात मोठी तफावत राजकारणी आणि सर्वसामान्यांच्या गुन्हेगारीमध्ये दिसून येते. सध्याच्या परिस्थितीत कोणत्याही सरकारी कामाकरीता पोलिस व्हेरिफिकेशन असने गरजेचे असते आणि केलेही पाहिजे.यातुन हे सिद्ध होते की त्या व्यक्तींवर काही गुन्हा तर दाखल झाला नाही ना! यामध्ये विद्यार्थी, सर्वसामान्य,नौकर वर्ग, व्यापारी, व्यावसायिक, नौकरीसाठी आवेदन करणारे बेरोजगार युवक यांच्या पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये जर कोणताही छोटा-मोठा गुन्हा आढळला तर त्याचे संपूर्ण आयुष्य धुळीस मिळते.हालाकी त्याने आपल्या गुन्हेगारी प्रवृत्तीला तिलांजली जरी दिली असली तरीही त्याला कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगार ठरविण्यात येतो.परंतु राजकारणी जेव्हा अनेक गुन्ह्यांनी लथपथ होतात तेव्हा ते अनेक पळवाटा शोधतात व तो मार्ग त्यांना सहज अवगत होतो.कारण कायदे बनविणारे राजकारणीच असतात त्यामुळे आपल्या सोयीनुसार कायद्यात उलटफेर करून आपल्या हिताचे करतात.ड.अश्विनी उपाध्याय यांनी २०१६ मध्ये जनहित याचिका दाखल केली होती.यामध्ये लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ८ आणि ९ च्या संवैधानिक वैधतेला आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने असे म्हटले होते की राजकीय पक्षांनी स्वच्छ प्रतिमेचे लोक का शोधू शकत नाहीत,हे स्पष्ट करावे अशी मागणी याचिकेत केली आहे.मी याचिकाकर्त्यांच्या मताशी पुर्णपणे सहमत आहे.कारण देशात असलेल्या गुन्हेगारांना जर राजकीय पक्ष प्रथम प्राधान्य देत असेल व खतपाणी घालत असेल आणि अशा परिस्थितीत त्यांना स्वच्छ प्रतिमेचा व्यक्ती दिसत नसेल तर ही कसली लोकशाही म्हणावी!आज देशात हजारो गुन्हेगारांनी राजकारणात प्रवेश करून आमदार खासदार मंत्री बनुन लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी झाल्याचे दिसते ही बाब लोकशाहीला घातक आहे.आज सर्वसामान्यांनी थोडासाही गुन्हा केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई करून तुरूंगात डांबले जाते व त्यांच्या परिवाराची उलटसुलट तपासणी करून टॉर्चर केले जाते. परंतु याबाबतीत राजकीय पुढाऱ्यांबाबद मात्र शिथिलता दिसून येते. हा सर्वसामान्यांवर अन्याय नाही का? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी आपल्या हिताप्रमाणे कायद्यात बदल करून आपली राजकीय पोळी नेहमीच शेकत असतात ही बाब जगजाहीर आहे. म्हणुनच केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकारण्यांना शिक्षा भोगल्यानंतर आयुष्यभर निवडणूक लढण्यापासुन रोखता येणार नाही.यात संपूर्णपणे राजकीय पुढाऱ्यांचा व राजकारण्यांचा स्वार्थीपणा स्पष्ट दिसून येतो.जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यांला दोषी ठरवण्यात आले,तर तो आयुष्यभर सेवेबाहेर रहातो,मग दोषी व्यक्ती संसदेत कशी काय येऊ शकते?कायदे मोडणारे कायदे कसे बनवू शकतात? सध्याच्या कायद्यानुसार,जर एखाद्या व्यक्तीला फौजदारी प्रकरणात २ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झाली तर शिक्षा पूर्ण झाल्यानंतर ६ वर्षांच्या कालावधीसाठी त्याला निवडणूक लढवण्यास मनाई आहे.एवढे असुनही राजकारण्यांची मनमानी दिसून येते.विद्यार्थी, बेरोजगार युवक व अन्य संघटना यांनी मोर्चे काढले यांच्यावर जेव्हा गुन्हा दाखल होतो तेव्हा हाच गुन्हा पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये आड येतो अशा परिस्थितीत त्या युवकांना आपल्या कॅरीअर पासुन वंचित राहावे लागते हा त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर मोठा आघात व प्रहार पडतो.परंतु राजकारण्यांना मात्र राजकारण करण्यासाठी मोकळीक हवी असते त्या पध्दतीने कायदे वळवितात ही बाब सर्वसामान्यांसाठी व लोकशाहीसाठी घातक आहे असे मी समजतो.राजकारणी मोठमोठ्या घोटाळ्यांनी व अनेक गुन्ह्यांनी लथपथ असतात तरीही त्यांचे राजकारण सुरळीत आणि सुखरूप सुरूच असते त्यामुळे यांच्यावर अंकुश असने गरजेचे आहे.याकरीता सर्वोच्च न्यायालय, महामहीम राष्ट्रपती यांना विनंती करतो की सर्वसामान्यांनप्रमाणेच राजकारण्यांना शिक्षा व कायद्याची संपूर्ण बंधने असायला हवे.जय हिंद!

*************

**लेखक**

**रमेश कृष्णराव लांजेवार**

**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**

**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# मुस्लिमांच्या सामाजिक न्यायाचे संकल्पचित्र

योगेंद्र यादव, राष्ट्रीय संयोजक, भारत जोडो अभियान

मुस्लिमांसाठी आरक्षणही कल्पना वाईट आहे. मुस्लिमांसाठी सामाजिक न्यायाच्या धोरणाची आवश्यकता आहे. माझ्याप्रमाणेच या दोन्ही विधानांशी तुम्ही सहमत असाल तर तुमचं म्हणणं विसंगत आहे, असं वाटू शकतं. त्यात तुमचा दोष नाही. ही अडचण सामाजिक न्यायाच्या भारतातल्या सध्याच्या राजकारणामुळे निर्माण झाली आहे. या राजकारणामुळे सार्वजनिक शिक्षणात आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण आणि सामाजिक न्याय हे जणू समानार्थी शब्द झाले आहेत. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या सर्व संघर्षांची परिणती कोट्याच्या राजकारणात किंवा कोट्याअंतर्गत कोटा यामध्ये होत राहाते. कोणत्याही समूहावर अन्याय झाला की ते आरक्षणाची मागणी करू लागतात मग तो माजी शासकीय अधिकाऱ्यांचा समूह असो, लैंगिकदृष्ट्या अल्पसंख्य समूह असो किंवा स्थलांतरित समूह असोत. जणू भारतीय राज्यसंस्था एखाद्या सर्जनसारखी आहे. कोणताही रुग्ण असो- या सर्जनच्या हातात चाकू हे एकच शस्त्र आहे!

त्यामुळे संपूर्ण मुस्लीम समुदायासाठी आरक्षण असले पाहिजे, अशी मागणी होत आहे, यात काहीही आश्चर्य नाही. सच्चर समितीने मुस्लीम समुदायाची 'सामाजिक धार्मिक समूह' म्हणून नोंद केल्यापासून या मागणीचा जोर वाढला. स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिमांच्या भीषण शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थितीचा सर्वसमावेशक आढावा घेणारा हा पहिला अधिकृत अहवाल होता. या अहवालाने मुस्लिमांची विदारक परिस्थिती मांडली; पण त्यांना आरक्षण द्यावे, अशी शिफारस केली नाही. भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने अल्पसंख्याकांना शासकीय नोकऱ्या आणि शिक्षणात १५ टक्के (मुस्लिमांना १० टक्के) आरक्षण देण्यात यावे, अशी शिफारस केली. या शिफारसीला मुस्लीम नेत्यांनी पाठिंबा दिला. गेल्या काही वर्षांतील मुस्लिमांची परिस्थिती लक्षात घेऊन अनेक बुद्धिवंतांनीही या मागणीला समर्थन दिले. या राजवटीमध्ये हे आरक्षण दिले जाईल, असे कुणालाही वाटत नाही; पण मुस्लिमांना सामाजिक न्याय देण्यासाठी आरक्षणाची ही चौकट त्यांच्या पुढ्यात ठेवण्यात आलेली आहे.

अलीकडेच 'रिथिंकिंग ॲफर्मेटिव्ह ॲक्शन फॉर मुस्लिम्स इन कन्टेम्पररी इंडिया' या शीर्षकाचा अहवाल प्रसिद्ध झाला. हिलाल अहमद, मोहम्मद संजीर आलम आणि नझीरा परवीन यांनी 'यूएस-इंडिया पॉलिसी इन्स्टिट्यूट' आणि 'सेंटर फॉर पॉलिसी रीसर्च' या दोन संस्थांच्या वतीने केलेल्या संशोधनाच्या आधारे अहवालाचे लेखन केले आहे. हा अहवाल मुस्लिमांसाठीच्या सामाजिक न्यायाची चर्चा तीन टप्प्यांत पुढे नेतो.

मुस्लिमांना सामाजिक न्यायाची आवश्यकता का आहे, हा या अहवालातला पहिला मुद्दा आहे. सामाजिक न्यायासाठी संपूर्ण मुस्लीम समुदायाला आरक्षण देणे, हा काही चांगला उपाय असू शकत नाही, हा दुसरा मुद्दा. सर्वांत महत्त्वाचा तिसरा मुद्दा- सध्या विविध मुस्लीम समुदायांवर होत असलेल्या अन्यायाला तोंड देण्यासाठी विविध धोरणात्मक उपाय या अहवालाने सुचवले आहेत. या अत्यंत वादग्रस्त आणि संवेदनशील प्रश्नाबाबत सार्वजनिक धोरण काय असावे, यासाठीची नेमकी चौकट अहवालाने उपलब्ध करून दिली आहे. यानिमित्ताने मुस्लिमांसाठीच्या सामाजिक न्यायाची अधिक गंभीर चर्चा होणे गरजेचे.

पहिला मुद्दा अगदी प्राथमिक स्वरूपाचा आहे. मुस्लीम हा सध्याच्या राजवटीत दहशतीखाली वावरणारा धार्मिक अल्पसंख्य समूह आहेच. त्याशिवाय शैक्षणिक आणि आर्थिक बाबतीत वंचित असलेला हा समूह आहे. या अहवालाने सच्चर समितीमध्ये वर्णन केलेल्या मुस्लिमांच्या अवस्थेची कहाणी ताज्या आकडेवारीसह मांडली आहे. अलीकडच्या अधिकृत माहितीच्या आधारे, या अहवालात म्हटले आहे की, शैक्षणिक बाबतीत मुस्लिमांची अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) या समूहांशी तुलना होऊ शकते तर उत्पन्न आणि संपत्तीच्या बाबतीत त्यांची तुलना इतर मागासवर्गीयांसोबत (ओबीसी) होऊ शकते. आर्थिक स्थितीमुळे किंवा पालकांच्या शैक्षणिक स्तरामुळे तरुण मुस्लिमांच्या शिक्षणाची दुर्दशा झालेली नाही. समान आर्थिक अवस्था असलेल्या उच्चजातीय हिंदू आणि मुस्लिमांची तुलना केली तर, उच्च शिक्षण संस्थांमध्ये जाणाऱ्या, खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या, इंजिनीअरिंग आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या उच्चजातीय हिंदूंचे प्रमाण मुस्लिमांच्या प्रमाणाच्या दुपटीहून अधिक आहे.

# गर्द गुहेतील 'मार्लेश्वर' तुम्ही पाहिलं का?

मार्लेश्वर रत्नागिरी जिल्ह्यातील एक धार्मिक स्थान आहे. येथील डोंगररांगेतील एका गुहेत मार्लेश्वर हे प्रसिद्ध शिव मंदिर आहे. नागांचे वास्तव्य असलेले स्थान अशी त्याची ख्याती आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मार्लेश्वरचा धबधबा. याठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक येतात. मार्लेश्वर हे निसर्गाच्या कुशीत वसलेलं ठिकाण आहे. भर पावसात देखील याठिकाणी खूप भाविक अन पर्यटक येत असतात. मार्लेश्वरचे मंदिरच नाही तर येथील धबधबा देखील विलोभनीय आहे. मार्लेश्वरचे मंदिर गर्द गुहेत असल्याने भाविक-पर्यटक इथे आवर्जून जातात.

गर्द गुहेतील मार्लेश्वर मंदिर

मार्लेश्वर एक प्राचीन मंदिर असून भगवान शिवाला समर्पित आहे. या मंदिराची ख्याती म्हणजे संपूर्ण मंदिर एका गुहेत आहे. दुसरी खासियत म्हणजे गुहेत दीप, समईचाच उजेड असतो. मारळमधून पुढे जाताना आजूबाजूला हिरवीगार झाडी निदर्शनास पडते. मार्लेश्वरची मुख्य कमान असून प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर काही अंतरावर पार्किंगची सोय आहे. अगदी प्रवेशद्वारापासूनच हार, फुले, खेळण्यांची वेगवेगळी दुकाने पाहायला मिळतात. अन्नपदार्थ आणि विविध वस्तूंचे स्टॉल्स दिसतात. मार्लेश्वरच्या गुहेपर्यंत जाण्यासाठी तब्बल ५२० पायऱ्या चढाव्या लागतात. सिमेंट आणि दगडी पायऱ्यांवरून सहजतेने मंदिरापर्यंत पोहोचता येते. पायऱ्यांवरून जात असताना डोंगर कपारावरून खळखळून वाहणारे पाणी मोहून टाकते. इथे विविध पक्षी आणि माकडांचा वावर अधिक असतो. पायऱ्यांवरून जाताना उंच डोंगरांचे विलोभनीय दृश्य नजरेस दिसते.

डोंगरातच ही गुहा असून गर्द काळोखातील हे महादेवाचे मंदिर मनाला शांती देणारे आहे. गुहेत जाण्यासाठी एका छोट्या दरवाज्यातून एकच व्यक्ती आतमध्ये जाऊ शकते. गुहा मात्र पाच-दहा माणसे बसू शकतील, इतकी मोठी आहे. गुहेत गेल्यानंतर महादेवाची पिंड असून आजूबाजूला खूप साऱ्या पितळेच्या नागाच्या मूर्ती दिसतात. काही अन्य देवदेवतांची दगडी शिल्पे आहेत. गुहेस लाईट कधीच लावली जात नाही. २४ तास इथे समई, दिवे लावले जातात. एक वेगळाच अनुभव तुम्हाला याठिकाणी मिळेल.

मार्लेश्वर धबधबा -

पावसाळ्यामध्ये हा धबधबा प्रवाहित होतो. लक्षवेधी मार्लेश्वरच्या धबधब्याचे रौद्र रुप पावसाळ्यात पाहता येते. कुटुंबासह जाणार असाल तर पावसाळ्यानंतर जावे. तेव्हा धबधब्यापर्यंत पोहोचता येते. धबधब्यापर्यंत पोहोचण्यासाठी १२-१५ मिनिटे छोटे-मोठे दगड चढावे लागतात. पण धबधब्याजवळ पोहोचताच निळेशार नितळ पाणी तुमचे स्वागत करायला तयार असते. धबधब्याच्या पाण्यात उतरताही येते. परिवारासह तुम्ही या ठिकाणी निसर्गाचा आनंद घेऊ शकता.

कसे जाल मार्लेश्वरला?

कोल्हापूर-वाघबीळ-शाहूवाडी-मलकापूर-वारुळ-आंबा घाटातून जाताना उजवीकडे एक छोटेसे मंदिर आहे. त्याला लागून एक कच्चा




रस्ता जातो, जो मार्लेश्वर मंदिराजवळ जाणारा आहे.

दुसरा रस्ता -

कोल्हापूर-वाघबीळ-शाहूवाडी-मलकापूर-वारुळ-आंबा घाट उतरल्यानंतर देवरुखमधून मारळ या गावातून जावे लागते.

-वाळप काय खाल? मंदिराच्या प्रवेशद्वारातूनच अनेक दुकाने तुम्हाला पाहायला मिळतील. शोभेच्या वस्तू, खेळणीची दुकाने, लाकडी खेळणी, सौंदर्य प्रसाधने, कोकम, लस्सी, ताक, लिंबू सरबतची अनेक दुकाने आहेत. ताजी कोकम फळांची चव इथे चाखायला मिळते. आमसूल तांदळाच्या उकडी मोदकावर साजूक तुपाची सोडलेली धार तोंडाला पाणी सुटणारी आहे. शुद्ध शाकाहारी आणि सात्विक जेवणाच्या थाळीत तांदळाची भाकरी, झुणका, पापड, लोणचे, भात, सोलकढी, भाज्या, भरलेले वांगे असे पदार्थ मिळतात. ताजे आमसूल आणखी काय पाहाल? आंगवलीतील मंदिर - श्री देव मार्लेश्वर हे जुने मंदिर असून पाहण्यासारखे आहे.

राजवाडी गरम पाण्याचे कुंड -वाळप सोमेश्वर मंदिर, राजवाडी - देवरुख-संगमेश्वर-धामणी-राजवाडी अशा मार्गाने या गावात पोहोचता येते. तर चिपळूणहून संगमेश्वरकडे जात असताना राजवाडी येथे महामार्गापासून आत जवळ असलेले हे मंदिर आहे. शास्त्री नदी पूल आरवली क्रॉस करून पुढे गेला की एक गरम पाण्याचे कुंड आहे. पुढे एक भग्न मंदिर आणि तिथं गरम पाण्याचे आणखी एक कुंड आहे. तेथून पुढे साधारण ३ किमी अंतरावर सोमेश्वर राजवाडीचा फाटा (ता. संगमेश्वर) आहे. राजवाडी गावात एक सुंदर मंदिर आहे! घनदाट झाडीत वसलेले सोमेश्वर मंदिर हे दोन गाभाऱ्यांमुळे खास ठरते. खालच्या गाभाऱ्यात सोमेश्वर महादेव तर वरच्या गाभाऱ्यात नागधारण गणेशाची मूर्ती आहे. राजवाडी परिसरात गरम पाण्याची कुंडे आहेत. तुरळ येथेही गरम पाण्याचे कुंड पाहायला मिळतात. राजवाडी-सोमेश्वर मंदिर -वाळप कर्णेश्वर मंदिर - रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर याठिकाणी कर्णेश्वराचे प्राचीन मंदिर असून ते पाहण्यासारखे आहे. कसबा पेठ येथील सरदेसाई वाडा, छत्रपती संभाजी महाराज स्मारक स्थळ, सप्तेश्वर मंदिर अशी ठिकाणे पाहता येतील.

## लठ्ठपणा, अनहेल्दी चांगले वाटत नाही गोविंदाच्या लेकीने सांगितला वजन वाढल्यानंतरचा संघर्ष; वाचा, टोकाच्या डाएटिंगचा कसा होतो आरोग्यावर परिणाम

अभिनेता गोविंदाची मुलगी टीना आहुजाने २०१५ मध्ये 'सेकंड हँड हसबंड' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते, पण हा तिचा पहिला आणि शेवटचा चित्रपट ठरला. अलीकडेच तिने कर्ली टेल्सिला दिलेल्या एका मुलाखतीत विविध मुद्द्यांवर भाष्य केले. या मुलाखतीत ती डाएटिंग आणि बॉडी इमेजविषयी स्पष्टपणे बोलताना दिसली. तिने एक परिपूर्ण शरीर मिळविण्यासाठी कसे कठोर डाएट केले याविषयी सांगितले.

टीना सांगते, मी प्रत्येक प्रकारचे डाएटिंग केले आहे. माझ्या किशोरावस्थेपासून माझ्याकडे एक न्युट्रिशनिस्ट होती. आलुच्या पराठ्यात ६००-७०० कॅलरी असतात, आलुचा पराठा खाण्याचा मी कोणालाही सल्ला देत नाही, मी फक्त ब्लॅक कॉफी घ्यायची. पण मी आता अशा टप्प्यावर आहे, जिथे मला आता खूप चांगले अन्न खायचे आहे. मी बेरी खाते, स्मूदी घेते, वर्कआउट करते, ग्रीन ज्युस पिते, नट्स खाते आणि आता मला खूप चांगली झोप येते.



टीनाने वडील गोविंदाविषयीसुद्धा सांगितले. जेव्हा तिचे वजन वाढले होते तेव्हा तिच्या शरीरावर टीका केली जायची. जेव्हा तिला विचारले की, गोविंदा अजूनही तिच्यातील कमतरता तिला दाखवतो का, त्यावर ती म्हणाली, आता नाही, तर माझ्या किशोरवयापासून हे चालू आहे. ते म्हणायचे 'तू फिट राहा, चांगले दिसायला हवे; लठ्ठपणा, अनहेल्दी आहे, चांगले वाटत नाही.'

टीना पुढे सांगते, एकदा शिल्पा शेट्टीने तिला चित्रपटाच्या स्क्रिनिंगसाठी आमंत्रित केले होते. तिथे मला पाहिल्यानंतर तिला माझे वजन खूप वाढले आहे हे समजले. शिल्पा शेट्टीचे आभार मी मानते की त्यांनी मला स्क्रीनिंगसाठी आमंत्रित केले. मी नुकतीच लंडनहून सुट्टी घेऊन आली होती आणि मी स्वत:ला परी समजून गेले, पण त्यानंतर मला इन्स्टाग्रामवर एक टॅग दिसला आणि मला तेव्हा वाटले की मी खूप जाड झाले आहे.

टीना सांगते, मी खूप जाड झाले आणि मला ते कळलेही नाही. मी व्यायाम करत नव्हती आणि खूप खात होती. मी आता वजन कसे कमी करावे यावर एक पुस्तक लिहू शकते. मला आता सर्व आरोग्यदायी ट्रिक्स आणि टिप्स माहीत आहेत. तिची आई सुनीतासुद्धा तिला निरोगी राहण्यास मदत करते.

टिना आहुजाचा प्रवास वजन कमी करण्याच्या प्रयत्नात लोक कोणत्या टोकाला जातात आणि याचा दीर्घकालीन आरोग्यावर कसा परिणाम होतो, याविषयी प्रश्न निर्माण होतात.

खूप जास्त प्रमाणात कॅलरीच्या सेवनावर निर्बंध लादल्याने दीर्घकालीन चयापचय क्रिया आणि एकूण आरोग्यावर कसा परिणाम होतो? वरिष्ठ न्युट्रिशनिस्ट आश्लेषा जोशी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगतात, कॅलरी सेवनावर जास्त निर्बंध लादल्याने हळू हळू मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर प्रभाव दिसू शकतो. जेव्हा शरीराला आवश्यक पोषक घटक मिळत नाही, तेव्हा त्याचा परिणाम चयापचय क्रियेवर पडतो. चयापचय क्रिया मंद झाल्याने वजन कमी करणे कठीण जाते. पोषक घटकाची कमतरता, थकवा आणि बिघडलेली दैनंदिन शारीरिक क्रिया यामुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

ती पुढे सांगते की, कॅलरीच्या सेवनावर निर्बंध घातल्याने आपण अनहेल्दी आहार घेतो. यामुळे शरीरासाठी पोषक नसलेल्या अन्नपदार्थाला प्रोत्साहन मिळते, यामुळे तणाव आणि एंग्झायटी इत्यादी समस्या आणखी वाढू शकतात. निराशा आणि स्वत:वर टीका करण्याचे एक चक्र निर्माण होते, जे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करते.

आहाराचा धोका

आहार म्हणजे जसे की पूर्णपणे कॉफीवर अवलंबून राहणे किंवा कमीत कमी जेवण करणे. असा आहार शरीराला आवश्यक पोषक घटकांपासून दूर ठेवतो, ज्यामुळे स्नायूंची झीज होते, प्रतिकारशक्ती कमकुवत होते आणि हार्मोन्स असंतुलित होतात. याशिवाय असा आहार तणावाची पातळी वाढवू शकतात आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे जेवण केल्यानंतरसुद्धा व्यक्ती जास्त प्रमाणात खाऊ शकतो, असे जोशी सांगतात. वजन नियंत्रित ठेवण्यासाठी दीर्घकाळ टिकणारा आणि संतुलित दृष्टिकोन कसा स्वीकारावा?

जोशी सांगतात, दीर्घकाळ टिकेल अशा दृष्टिकोनासाठी खाण्याच्या सवयींमध्ये हळूहळू बदल करा. यामध्ये विविध पौष्टिक पदार्थांचा समावेश करा आणि ऊर्जा टिकवून ठेवेल असे अन्नपदार्थ निवडा. आपण काय खातो यावर लक्ष केंद्रित केल्याने व्यक्तीला योग्य पोषक आणि संतुलित आहार घेता येतो.

## महा बँक कर्मचाऱ्यांनी आज मागणी दिवस पाळला!

बँक ऑफ महाराष्ट्र मधील देशभरातील एआयबीइएच्या सभासदानी आज आपल्या मागण्यांचे बिल्ले परिधान करून मागणी दिवस पाळला. बँकेतून सर्व स्तरातून पुरेशी नोकर भरती करण्यात यावी, आउटसोर्सिंग बंद करण्यात यावे, मान्यताप्राप्त संघटनेला विश्वासात घेऊन कर्मचाऱ्यांशी संबंधित सर्व निर्णय घेण्यात यावेत , संघटना कार्यालयासाठी मान्यताप्राप्त संघटना म्हणून वर्षानुवर्षांपासून देण्यात आलेली जागा जी बँकेने बेकायदेशीररीत्या हस्तगत केली आहे ती परत देण्यात यावी, स्पेशल असिस्टंटच्या जागा करारातील तरतुदीप्रमाणे त्वरित भरण्यात याव्यात, मुंबई हायकोर्टाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा पदाधिकारी या भूमिकेतील प्रतिनिधित्वाच्या हक्काबाबत दिलेल्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी या मागण्यांचा त्यात समावेश आहे.

देशभरातील ५१ झोन अंतर्गत काम करणाऱ्या तीन हजारावर सभासदानी यात भाग घेत. यानंतर ६ मार्च २०२५ रोजी देशभरातील सभासद निदर्शने, १२ मार्च २०२५ रोजी झोनल ऑफिस समोर धरणे, १७ मार्च २०२५ रोजी पुणे येथील बँकेच्या मुख्य कार्यालयासमोर धरणे आणि २०० मार्च रोजी एक दिवसाचा संप यात सहभागी होत आहेत.

व्यवस्थापनाने पुढाकार घेऊन जर सन्माननीय तोडगा काढला नाही तर एप्रिल महिन्यात ही आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा संघटनेतर्फे इशारा देण्यात येत आहे.

## दारु पिण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून दे दणादण....

दारु पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने युवकाला मारहाण झाल्याचा प्रकार येवला शहरातील मिल्लतनगरमध्ये बुधवारी (दि.१९) घडला.

मोहम्मद हुसेन मो. अनिस (२२, रा. बुंदेलपुरा) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित पप्या लंगड्या उर्फ साजिद बशीर शेख (रा. पिंजारगल्ली) याने दारुसाठी हजार रुपये मागितले. ते नाकारल्याने शेखने दोन मित्रांच्या मदतीने हुसेनला जावेद जिममागे घेऊन जात मारहाण व दुचाकीचे नुकसान केल्याचा आरोप आहे.

दोघा भावांना चौघांकडून मारहाण नाशिक : भांडण सुरू असलेल्या ठिकाणावरुन मुलाला घेण्यासाठी गेलेल्या दोघा भावांना चौघांनी मारहाण केल्याची घटना वऱ्हेदारणा येथील भगवती वजन काट्याजवळ शनिवारी (दि. २२) घडली. शांताराम पवार (४४) यांनी सायखेडा पोलिसांना दिलेल्या फिर्यादीनुसार, ते मुलगा वेदांत याला घेण्यासाठी गेले असता संशयित किरण बर्डे, करण बर्डे, दीपक बर्डे, दिनेश सोनवणे यांनी शिविगाळ केली. पवार यांचे बंधू आले असता दोघांना मारहाण झाली. हवालदार गायकवाड हे तपास करीत आहेत.

जमिन विकत घेणाऱ्यास मारहाण नाशिक : बाहेरील व्यक्तीने गावात जमिन घेतल्याच्या रागातून टोळक्याने संबंधित शेतकऱ्याला मारहाण केल्याची घटना नैताळे - गाजरवाडी रस्त्यावर रविवारी (दि. २३) रात्री घडली. जखमी वैभव शिवाजी गाजरे (२६, रा. गाजरवाडी) यांनी निफाड पोलिसांना दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित महेश बोरगुडे, बापू बोरगुडे यांसह ११ जणांनी त्याला




रस्त्यात रोखून, 'आमच्या गावात जमिन का घेतली. त्या व्यवहाराचे खरेदी खत रद्द कर' अशी दमबाजी केली. त्यास नकार दिल्याने बॅटने मारहाण झाल्याचा आरोप आहे. हवालदार घोलप हे घटनेचा तपास करीत आहेत.

भर दिवसा घरातून पळविले दागिने नाशिक : सकाळी कुटुंबीय कामाच्या गडबडीत असताना चोरट्याने घरात प्रवेश करीत ५५ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने पळविल्याची घटना ओझरच्या राजे संभाजीनगरमध्ये घडली. ज्ञानेश्वर रुईकर (३४) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोमवारी (दि. २४) सकाळी आठ वाजेच्या सुमारास साधारण २२ वर्षीय तरुणाने घरात प्रवेश करुन दागिने चोरुन पळ काढला. हवालदार पाटील हे घटनेचा तपास करीत आहेत.

## तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न भंगले; १६ लाख ८० हजाराचा चुना

डोंबिवली : शिक्षण क्षेत्रातील उच्चपदस्थ असल्याने मुलीला शासकीय कोट्यातून एमबीबीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवून देतो, असे सांगून बदलापूर आणि उल्हासनगरमधील तिघा जणांनी मिळून डोंबिवली एमआयडीसीच्या निवासी विभागात राहणाऱ्या एका रहिवाशाकडून १६ लाख ८० हजार रूपये उकळले. त्यानंतर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून न देता पैसे तर उकळलेच शिवाय या मुलीचे वैद्यकीय अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्षही वाया घालवले. हा सारा प्रकार सन २०२१ ते २०२२ या कालावधीत घडला आहे. या प्रकरणी तथाकथित तीन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या विरोधात मानपाडा पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.




तक्रारदार हे डोंबिवली एमआयडीसीच्या निवासी विभागात राहतात. मुलगी डॉक्टर व्हावी असे त्यांचे स्वप्न आहे. त्यासाठी मुलीला एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा होता. त्यासाठी वडील प्रयत्न करत होते. काही जणांशी ओळख झाल्यानंतर आम्ही शिक्षण क्षेत्रातील उच्चपदस्थ आहोत, असा मुलीच्या वडीलांसमोर देखावा उभा केला. त्यातील एकाने आपण केईएम रूग्णालयातील व्यवस्थापन समितीवर, तर दुसऱ्याने आपण नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात जबाबदार पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. सुरूवातीला त्यातील एकाने या प्रवेश प्रक्रियेसाठी ५० लाख रूपये लागतील असे तक्रारदाराला सांगितले. ही रक्कम तडजोडीनंतर १५ लाखांवर करण्यात आली.

शासकीय कोट्यातून आपली प्रवेश प्रक्रिया होणार आहे. दिलेले १५ लाख रूपये नंतर आपणास परत मिळतील, असा दिलासा देणाऱ्या तथाकथित उच्चपदस्थ अधिकाऱ्याने त्याचा बँक खात्याचा एक कोरा धनादेश तक्रारदाराला देऊन विश्वास संपादन केला. या बोलण्यावर विश्वास ठेऊन तक्रारदाराने टप्प्याने १६ लाख ८० हजार रूपये संबंधितांनी दिलेल्या बँक खात्यावर पाठविले.

पैसे भरणा केल्यानंतरही प्रवेश नाही

पैसे भरणा केल्यावर तक्रारदाराने आपल्या मुलीची प्रवेश प्रक्रिया कधी होईल म्हणून तगादा लावला. आपल्या मुलीचा प्रवेश शासकीय महाविद्यालयात नक्की झाला आहे. प्रवेश उशिरा झाल्याने परीक्षा होऊन तिची गुणपत्रिकासुध्दा तयार आहे, अशी माहिती त्यातील एका कथित उच्चपदस्थाने तक्रारदाराला दिली. हे बोलणे ऐकून मुलीच्या वडिलांना आश्चर्य वाटले. त्यांनी अन्य दोघांशी संपर्क साधला असता त्यांनी धक्कादायक माहिती दिली. तुमच्या मुलीची प्रवेश प्रक्रिया होणार नाही, त्यामुळे आम्हाला विचारू नका, अशी उत्तरे देऊन नंतर प्रतिसाद देणे बंद केले. हे ऐकून मुलीच्या पित्याच्या पायाखालची जमीन सरकली. त्यांनी या प्रकरणातील प्रमुख इसमाशी संपर्क साधला. त्या इसमाने तुमचे पैसे परत करू, असे आश्वासन दिले. त्यानंतर त्यानेही संपर्काला प्रतिसाद देणे बंद केले. प्रवेशासाठी पैसे घेऊन ते परत न करता फसवणूक केल्याबद्दल, तसेच मुलीचे शैक्षणिक वर्ष फुकट घालविल्याबद्दल हतबल पित्याने मानपाडा पोलिस ठाणे गाठून कागदोपत्री पुराव्यांसह तिन्ही तथाकथित उच्च पदस्थ अधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार गुन्हा नोंदवून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## आधी मैत्री, मग निर्जनस्थळी नेत...; गोव्यात आलेल्या 'त्या' युवतीचा प्रियकरानेच केला घात

देश-विदेशातील पर्यटक गोव्यातील निसर्गरम्य समुद्र किनार्यांचा आनंद लुटण्यासाठी गोव्यात येतात. यातील अनेकजण गोव्याच्या तर काहीजण चक्क गोमंतकीयांच्याच प्रेमात पडतात. दुहेरी नागरिकत्व असलेली अशीच एक युवती गोमंतकीय युवकाच्या प्रेमाच्या पडली आणि आपला जीवच गमावून बसली. या खून खटल्याचा निकाल नुकताच लागला असून तिचा प्रियकर असलेल्या युवकाला न्यायालयाने दुहेरी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. आयरिश आणि ब्रिटिशचे दुहेरी नागरिकत्व असलेली डॅनियल मॅकाग्लिन ही २८ वर्षीय युवती २०१६ मध्ये पर्यटनासाठी मैत्रिणीसोबत गोव्यात आली होती. याच काळात दिसायला हॅण्डसन आणि बोलघेवडा असणार्या गोव्यातील 'विकट भगत' या युवकाच्या ती संपर्कात आली. आधी मैत्री व त्यानंतर त्यांचे प्रेमात रूपांतर झाले. ते दोघे एकत्र पार्ट्यांही करू लागले. त्यांनी लग्न करण्याचाही निर्णय घेतला. इतकेच नव्हे, तर डॅनियल मॅकाग्लिन ही लग्नानंतर विकटला घेऊन ब्रिटनला जाणार होती. विकटनेही त्याला संमती दिली होती. विवाहानंतर विकट नागरिकत्वही बदणार होता, असा करारही त्यांच्यात झाला होता. डॅनियलने विकटला ब्रिटनमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनही दिले होते. २०१६ मध्ये व्हिसा संपल्याने डॅनियल मायदेशी परत गेली. पुढच्या वर्षी गोव्यात आल्यावर लग्न करून ब्रिटनला जायचं, असा बेतही दोघांनी केला होता. ठरल्याप्रमाणे फेब्रुवारी २०१७ मध्ये डॅनियल पुन्हा गोव्यात आली. हणजूणच्या किनार्यावर त्यांचे वास्तव्य होते. प्रियकर विकट भगतसोबत लग्न उरकून घेण्याचा तिचा विचार होता. १३ मार्च २०१७ रोजी होळीचा सण होता. त्या दिवशी डॅनियल विकटला भेटण्यासाठी पाळोळेला गेली. रात्रीच्या वेळी होळीचा उत्सव साजरा करायचा त्यांचा बेत होता. ते दोघे दिवसभर किनार्यावर फिरून रात्री होळी साजरी करण्यासाठी राजबागला आले. तिथे दोघांनी मद्यप्राशन केले. निर्जनस्थळी जात अमलीपदार्थांचे सेवनही केले. त्यानंतर विकटने तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली, मात्र तिने नकार दिला. अती मद्यपानाच्या नशेत बेभान असलेल्या विकटने तिच्यावर अतिप्रसंग करण्यास सुरुवात केली. दोघांची भांडणे होऊन प्रकरण हाणामारीपर्यंत गेले. त्याचवेळी भान हरपलेल्या विकटने तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केले. त्यानंतरही त्यांच्यात झटापट झाली. या झटापटीत विकटने डॅनियलचा गळा आवळून तिला ठार मारले. ती मृत झाल्याची खात्री करून घेण्यासाठी त्याने तिच्या डोक्यावर बिअरच्या बाटलीचा प्रहार केला.

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा आशियाना निवासस्थानी आलेल्या जिल्ह्यातील मान्यवरांशी संवाद

लातूर :– राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या आशियाना निवासस्थानी शुक्रवारी जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्थांचे पदाधिकारी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी दिलीपराव देशमुख यांनी संवाद साधला विविध विषयवार चर्चा केली आलेल्या मान्यवरांच्या अडचणी समजून घेतल्या अनेक विषयवार संबधित विभागातील अधिकाऱ्यांना सूचना दिल्या यावेळी रेणापूर येथील रेणा साखर कारखान्याचे संचालक पंडीत मानेरेनापुरचे नगरसेवक राम जोगदंड प्रदीप काळे सचिन इगे, मनोहर व्यवहारे केदार हालकुडे प्रदीप राठोड रोहित गिरी, जगन्नाथ गाडे, सचिन मोठे, लातूर तालुक्यातील अप्पासाहेब मुंडे,अशोकराव काळे दयानंद बिडवे अरुण कापरे,बाळासाहेब कदम, लातूर शहरातील डॉ साळुंके प्रवीण कांबळे, युनूस शेख यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते





# काशिनाथ जोंधळे यांच्याकडून कॉईल नगरात चार सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याबद्दल सत्कार

लातूर :– आपल्या परिसरात चोरी होवू नये,सर्वच घटकांची सुरक्षा अबाधित राहावी म्हणून सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ जोंधळे यांनी कॉईल नगरातील मनपाचे विकसीत केलेल्या बिल्डींगमध्ये स्वखर्चातून चार दिशांना,चार सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सामाजिक उत्तरादायित्व निभावल्याबद्दल येथील जनतेच्यावतीने त्यांचा गुरुवार,दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी त्यांचा शाल,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.

इंजि.मारुती कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला बाबुराव रणदिवे,तुळशीराम शेलार,अक्षय क्षीरसागर,सुरज जोंधळे,रुपेश जोंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती.सत्काराला उत्तर देताना काशिनाथ जोंधळे यांनी आपल्या ज्या परिसरात शांतता व सुरक्षितता राखण्याची सर्वांची जबाबदारी याची जाणीव ठेवून जगले पाहिजे,म्हणून आपण हे चार सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत.आपल्या लोकांनी केलेला सत्कार स्मरणात राहणारा असल्याचे सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबा आडगळे यांनी केले.सुरज जोंधळे यांनी आभार मानले.



# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कंत्राटदारांना सक्त सूचना लिफ्ट आणि स्काय वाकचे काम जलद गतीने पूर्ण करा.

किनवट: शेख शौकत :– नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिनांक २६ रोजी माहूर येथे भेट देऊन माहूर गडावरील श्री रेणुका देवी संस्थान येथे सुरू असलेल्या लिफ्ट आणि लिफ्ट आणि स्काय वाकच्या कामास भेट देऊन कंत्राटदारांनी काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सक्त सुचना देत श्री रेणुका मातेचे दर्शन घेतले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तहसीलदार किशोर यादव यांचे सह अधिकारी उपस्थित होते यावेळी नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांचे सह मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर दौऱ्यात माहूर गडावरील तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत बांधण्यात आलेल्या टुरिस्ट फॅसिलिटी सेंटर येथे भेट देऊन सर्वप्रथम पाहणी केली तसेच येथे भाविकांना सुविधा सोयी सुरक्षा बाबत माहिती घेत येथे पार्किंगसाठी उभारण्यात आलेल्या जागेची सुद्धा पाहणी केली. यानंतर त्यांनी गडावरील सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्काय



वाकच्या कामांची पाहणी करत येथील कंत्राटदार व अधिकाऱ्यांना काम जलद गतीने पूर्ण करण्याची सक्त सूचना केल्या यानंतर त्यांनी श्री रेणुका माता मंदिरात जाऊन दर्शन घेत आरती केली . यावेळी विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी संजय कान्नव यांचे कडून त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सर्व विश्वस्त पुजारी कर्मचारी सुरक्षा रक्षक उपस्थित होतेदर्शनानंतर विश्रामगृह येथे लिफ्ट आणि स्कायबागच्या कामाच्या कामात उठवले जाणारे व्यापारी आणि जिल्हाधिकारी यांच्या समन्वय बैठक झाली. यावेळी बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे तहसीलदार किशोर यादव वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे नायब तहसीलदार डॉ .राजकुमार राठोड सहाय्यक अभियंता रवींद्र उमाळे सहाय्यक अभियंता आकाश राठोड प्रोजेक्ट मॅनेजर विडेकर आणि माने यांचे सह मान्यवरांची उपस्थिती होती

## लातूर ग्रामीण मतदारसंघातील विकास कामाबाबत पालकमंत्री भोसले यांच्याशी राजेश कराड यांची चर्चा



लातूर :– राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांचे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने श्री पांडुरंगाची मूर्ती व भगवत गीता ग्रंथ भेट देऊन भाजपा नेते राजेश कराड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले.

लातूर येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले आणि भाजपा नेते राजेश कराड यांच्यात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामाबाबत सविस्तर चर्चा झाली. लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड हे गेल्या काही दिवसापासून डोळ्याच्या आजारामुळे बाहेर पडू शकले नाही त्यामुळे त्यांच्या प्रकृतीची पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आस्थेवाईकपणे चौकशी करून राजेश कराड यांच्याकडून माहिती घेतली.

यावेळी राजेश कराड यांच्यासमवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजनेचे लातूर तालुका अध्यक्ष वैभव सापसोड, रेणापूर तालुका अध्यक्ष वसंत करमोडे यांच्यासह सतीश आंबेकर, डॉ बाबासाहेब घुले, अनंत चव्हाण, श्याम वाघमारे, संभाजी वायाळ, भैरवनाथ पिसाळ, श्रीकृष्ण जाधव, शरद दरेकर, विजय मलवाडे, प्रताप पाटील, धनराज शिंदे, आदिनाथ मुळे, सुकेश भंडारे, गणेश तुरुप, अमित रोडे, सुरेश पाटील, अशोक सावंत, भाऊसाहेब गुळविले, बाळासाहेब कदम, ओम चव्हाण, शंकर चव्हाण, शुभम खोसे, संतोष चव्हाण, संजय डोंगरे, राजकुमार मानमोडे, वैजनाथ लहाने, शिवाजी जाधव यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बहुजन समाज पार्टी पूर्णा शहराध्यक्षपदी सुरेंद्र नरवाडे यांची निवड



पूर्णा :– गंगाखेड विधानसभेतील बहुजन समाज पार्टी बैठक पुर्णा या ठिकाणी दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाली. विधानसभा अध्यक्ष राजू खंदारे, विधानसभा उपाध्यक्ष अशोक पंडित , विधानसभा कोषाध्यक्ष भीमराव आवटे व गंगाखेड विधानसभा पुर्णा शहर अध्यक्ष पदी सुरेंद्र नरवाडे यांची निवड बसपा प्रदेश अध्यक्ष सुनील डोंगरे यांच्या आदेशाने, प्रदेश सचिव अनिरुद्ध रणवीर यांनी बसपा परभणी जिल्हा अध्यक्ष अशोक वायवळ यांच्या उपस्थित जाहीर करण्यात आले. यावेळी ,बसपा पदाधिकारी भीमराव जोंधळे,समाधान पोटभरे, धारबाजी गायकवाड, युवराज सूर्यतळे,प्रकाश खरे, अनिल इंगोले, व बसपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उर्सात येणाऱ्या भाविकांना सुविधा द्या तहसीलदार किशोर यादव यांचे आवाहन

किनवट: शेख शौकत :–माहूर शहरात ५ मार्च ते दहा मार्चपर्यंत साजरा होणारा बाबा सोनापीर यांच्या उर्स मध्ये येणाऱ्या सर्व धर्मीय भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध देण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत दिनांक २७ रोजी सर्व विभाग प्रमुखां सह मान्यवरांना केले दरवर्षीप्रमाणे यावर्षी बाबा सोनातील दर्गा येथे दिनांक पाच ते दहा या कालावधीत उर्फ साजरा होणार असल्याने ते सर्व प्रकारचे मनोरंजनाची साधने खेळणी कपडा व इतर ठिकाणी लागणार आहे रमजान महिना असल्याने कव्वालीचा कार्यक्रम होणार नाही त्यामुळे येथे लहान मुला बाळासह मोठ्या प्रमाणात भाविक येणार आहेत त्यांची सुरक्षा पाणी स्वच्छता आरोग्य व्यवस्था यासह इतर व्यवस्थाकडे सर्व विभाग प्रमुखांनी जातीने लक्ष द्यावे असे आवाहन केले यावेळी तहसीलदार किशोर यादव नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता डी के भिसे स पो नि शिवप्रकाश मुळे मरावीमचे सहाय्यक अभियंता आर बी शेंडे मुजावर बाबीर फकीर मोहम्मद तसेच सज्ञादा नशीन साजिद जहागीरदार डॉ ए डी आंबेकर आगारप्रमुख चंद्रशेखर समर्थवाड राज्य उत्पादन शुल्क चे आर पी पवार नपचे कार्यालय अधीक्षक वैजनाथ स्वामी तालुका आरोग्य सहाय्यक एस आर जोगपेटे मंडळ अधिकारी एस के साळसुंदर वनपाल



मीर साजिद अली महसूल सहाय्यक सीपी बाबर यांचे सह मान्यवर उपस्थित होते यावेळी बाबा सोनापीर दर्गाह येथे प्रत्यक्ष जाऊन वरील सर्व मान्यवरांनी पार्किंगची जागा दर्गाह परिसर दुकानांची जागा दवाखाना पोलीस चौकी यासह इतर सर्व बाबींची पाहणी केली यावेळी ज्येष्ठ पत्रकार वसंतराव कपाटे विजय आमले मनोज कीर्तने दत्ता शेरेकर इलियास बावाणी सौ पद्मा गिऱ्हे राज ठाकूर सौ सुरेखा तळणकर जयकुमार अडकिने व्ही एम मरेवाड भगवान कांबळे राजकिरण देशमुख राजू दराडे पी एस कांबळे जी डी जाधव रहीम चांद कुरेशी अकबर रज्ञाक शेख सुरेश सातपुते चालक विलास शेडमाके यांचे सह अधिकारी कर्मचारी मान्यवर उपस्थित होते

# डॉ. अशोक पोद्दार यांची महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असो.च्या . विभागीय उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशन बेस्ट चॅप्टर अवॉर्डने सन्मानित

लातूर : लातूर येथील ज्येष्ठ अस्थिशल्य चिकित्सक तथा पोद्दार ॲक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरचे संचालक डॉ. अशोक पोद्दार यांची महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या विभागीय उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नाशिक येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र ऑर्थो. असो.च्या वार्षिक संमेलनात लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशनला बेस्ट चॅप्टर अवॉर्ड तसेच बेस्ट महाराष्ट्र ऑर्थोपेडिक दिवस अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशनचे वार्षिक संमेलन नाशिकमध्ये पार पडले. या संमेलनात लातूर ऑर्थोपेडिक असो.चे अध्यक्ष डॉ.अशोक पोद्दार यांची विभागीय उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. डॉ. अशोक पोद्दार व डॉ. संतोष माळी यांचे ऑर्थोपेडिक ,सामाजिक, वैद्यकीय शिक्षण विषयक उपक्रम, सीएमई , १२ ऑर्थोपेडिक सीएमई, ५ समाजोपयोगी उपक्रम त्याचप्रमाणे ऑर्थोपेडिक तज्ज्ञांना एकत्रित करून आऊट डोअर सीएमई च्या आयोजनातही मौलिक योगदान राहिले आहे. डॉ. अशोक पोद्दार व डॉ.संतोष माळी यांनी आपल्या कार्यकाळात लातूर ऑर्थोपेडिक संघटनेला १० एमएमसी पॉईंट मिळवून दिले आहेत. लातूर ऑर्थोपेडिक असो.च्या वतीने त्यांनी मॉर्निंग वॉकर्स संघटनेसाठी हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी, बीपी, शुगर तपासणी, ज्येष्ठ नागरिकांसाठी लेक्चर्स, वैद्यकीय कायदेविषयक लेक्चर्सच्या आयोजनातही पुढाकार घेण्याचे काम केले आहे. वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरासाठीही ते कायम आग्रही असतात. लातूरचे ज्येष्ठ ऑर्थोपेडिक तज्ज्ञ दिवंगत डॉ. जगदीश अग्रोया, डॉ. रामेश्वर कांदे यांच्या स्मरणार्थ एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून ऑर्थोपेडिक विषयात पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याची घोषणाही डॉ. अशोक पोद्दार व डॉ. संतोष माळी




यांनी केली आहे. डॉ. अशोक पोद्दार व सचिव डॉ. संतोष माळी यांच्या कुशल नेतृत्वाखाली लातूर ऑर्थोपेडिक असो. ने केलेली नेत्रदीपक कामगिरी पाहूनच महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असो. लातूरला बेस्ट चॅप्टर अवॉर्ड तसेच बेस्ट महाराष्ट्र ऑर्थोपेडिक दिवस अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. जिल्हाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार व सचिव डॉ. संतोष माळी यांनी इंडियन ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. नवीन ठक्कर, महाराष्ट्र ऑर्थो. असो.चे अध्यक्ष डॉ. कोठाडिया, सचिव डॉ. अभिजित वायगावकर यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी नाशिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ऑर्थोपेडिक परिषदेचे अध्यक्ष डॉ. अग्रवाल, सचिव डॉ. प्रशांत भुतडा यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर असोसिएशनचे अध्यक्ष या नात्याने आपले मनोगत व्यक्त करताना सर्वांच्या सहकार्याने लातूर ऑर्थोपेडिक असोसिएशनने हा पुरस्कार पटकावल्याचे सांगितले. ऑर्थोपेडिक क्षेत्रांतील वरिष्ठांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन, शुभेच्छा यामुळे आम्हाला सर्वांना चांगल्या कामाची प्रेरणा मिळाली आणि त्यातून संघटना सर्वोत्कृष्ट कार्य करू शकली. या पुरस्काराबद्दल या क्षेत्रातील सर्व ज्येष्ठ मान्यवरांचे आपण आभार व्यक्त करतो, असेही डॉ. पोद्दार यांनी सांगितले.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत अहमदपूर तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन

लातूर :– राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत अहमदपूर तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन झाले. तालुका पशुचिकित्सालय इमारत आणि रस्ते विकास कामांचा यामध्ये समावेश होता. आमदार विक्रम काळे, आमदार संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्ज्वला पांगारकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश क्षीरसागर, कार्यकारी अभियंता अलका ढोके, उपअभियंता जी. बी. भोसले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री ना. भोसले आणि सहकार मंत्री ना. पाटील यांच्या हस्ते अहमदपूर तालुक्यातील हसर्णी सावरगाव थोट शेलदरा केकत सिंदगी ते जिल्हा सरहद्द रस्ता (प्रमुख जिल्हा मार्ग–२५) रुंदीकरण आणि हसर्णी गावात सिमेंट काँक्रिट नाली बांधकाम या कामाचे भूमिपूजन झाले. या कामासाठी १० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. यासोबतच अहमदपूर तालुक्यातील प्रमुख जिल्हामार्ग–२० ते धानोरा–सताळा–महाळंगी–जानवळ–शिवणखेड–मुगाव रस्ता (प्रमुख जिल्हा मार्ग–१७), धानोरा गावातील सिमेंट रस्ता आणि रुंदीकरण कामाचे भूमिपूजन यावेळी झाले. या कामासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अहमदपूरयेथीलतालुकापशुचिकित्सालयइमारतबांधकामाचे पालकमंत्री ना. भोसले आणि सहकार मंत्री ना. पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. या इमारतीच्या कामासाठी



२ कोटी ४९ लक्ष रूपये निधी मंजूर करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून काम करताना विविध विकास कामांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले. तसेच विविध योजनांची अंमलबजावणी करून गरीब, गरजूंना मदत करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. शासनाने सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अथवा इतर कोणतीही योजना बंद होणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

अहमदपूर व चाकूर तालुक्यातील विकास कामांना गती देण्यात येईल. या भागात सिंचन सुविधा निर्मितीसाठी अंतेश्वर उपसा सिंचन योजनेकरिता आवश्यक कार्यवाही सुरू आहे. याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील हे सकारात्मक असून त्यांनी याअनुषंगाने संबंधितांना सूचना दिल्या आहेत. यासोबतच विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या माध्यमातून विविध सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार विभागाच्या माध्यमातून सहकार्य केले जाणार असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE